जुलै २०१२ खंड ५ अंक ४

श्री राम चंद्र मिशन®

India ECHOES
ONE WORLD ONE HUMANITY



गुरुदेवांचा रिपोर्ट

चेन्नई येथे गुरुदेव

अभ्यासींसमवेत चर्चा करताना गुरुदेव म्हणाले की, "आपल्यामध्ये तातडीची जाणीव रुजवणे व त्याचवेळी मनातील भीतीची भावना काढून टाकणे हे आपले काम आहे. साधारणत: जिथे तातडीने काहीतरी करण्याची गरज असते तिथे भीती सुद्धा असते. पण सहजमार्गात आपण भीतीच्या जाणीवेचे उच्चाटन करून तातडीची जाणीव स्थापित करण्याचे कार्य केले पाहिजे."

नववर्षाचे उत्सव

दि. १३ एप्रिल रोजी तामिळ नववर्ष असल्याने गुरुदेवांनी सत्संगाचे संचालन केले. सर्वांचे लक्ष आपल्या प्राणप्रिय अशा गुरुदेवांकडे होते. गुरुदेवांसमवेत एक वैयक्तिक व आंतरीक असे संबंधन असण्याची अनुभूती प्रत्येकाला जाणवली. गुरुदेवांनी एक विवाह संपन्न केला. ते खूप थकलेले आणि दमलेले असूनदेखील त्यांना अभिवादन करण्यासाठी त्यांच्या कुटीरात आलेल्या अभ्यासींची त्यांनी भेट घेतली.

दि.१४ एप्रिल रोजी केरळच्या लोकांचे 'विशु' हे नववर्ष सुरु झाले. केरळहून सुमारे १५० अभ्यासी गुरुदेवांसोबत राहण्यासाठी आले होते. संध्याकाळी गुरुदेव कुटीराबाहेर येऊन बसले आणि अभ्यासी दहा–दहांचा गट करुन त्यांना भेटण्यासाठी आले. गुरुदेवांनी प्रत्येकाकडे वैयक्तिक लक्ष पुरविले आणि त्यानंतर ते आतमध्ये काम करण्यासाठी गेले. उपस्थितांपैकी अनेक अभ्यासींचे हृदय भारावून गेल्याचे दिसून येत होते.

'त्यांना' मोकळीक (मुभा) द्या

सोमवारी दि. १६ एप्रिल रोजी गुरुदेवांनी सत्संग संचालित केला आणि मोरोक्कोच्या पाच अभ्यासींसमवेत बातचीत केली. त्या सर्व अभ्यासींना अश्रू आवरता आले नाहीत. एका भगिनीने त्यांना प्रिय व्यक्तिच्या मृत्युविषयी सांगितले. यावर गुरुदेव म्हणाले, "सर्वांना सामावून घेता येईल एवढे आपले हृदय विशाल असावयास हवे. किती अभ्यासी येतात आणि जातात. त्या सर्वांना गुरुदेवांच्या हृदयात स्थान मिळते. आपण जेव्हा फक्त काही व्यक्तींवरच प्रेम करतो तेव्हा त्यांचा मृत्यु झाल्यास आपल्याला त्रास होतो. खुल्या अशा हृदयात जेव्हा सर्वांसाठी प्रेम असते तेव्हा गमावण्याचे दु:ख जाणवत नाही."

प्रत्येकाची भेट घेण्याचा अथक प्रयत्न गुरुदेव नेहमीच करत असतात. तरीही कुटीरामध्ये अनेक लोक सतत जमा होतात आणि ते सर्व गुरुदेवांचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न करतात, या विषयी गुरुदेवांनी असमाधान व्यक्त केले. यानंतर गुरुदेवांनी विसावा घेण्याचे आणि ज्या ठिकाणी त्यांना आराम मिळेल अशा ठिकाणी जाण्याचे ठरवले. हे स्थान गुप्त ठेवण्यात आले. तेथे गुरुदेवांना आवश्यक ती विश्रांती आणि एकांत मिळाला. दि.२७ एप्रिल रोजी गुरुदेव कुटीरामध्ये परतले.

बाबूजींचा जन्मदिवस समारंभ

रविवारी दि. २९ एप्रिल रोजी सकाळी गुरुदेवांनी सत्संगाचे संचालन केले आणि आठ विवाह संपन्न केले. नंतर कुटीरामध्ये कार्यकारी समितीची बैठक झाली. संध्याकाळी डेन्मार्क येथील व्रदस संडे आश्रमात असलेले बंधू भार्गव आणि बंधू कमलेश यांच्या समवेत व्हिडीओ कॉल सुरु करण्यात आला आणि संपर्काच्या परिक्षणासाठी गुरुदेव स्वत: आले कारण दुसऱ्या दिवशी त्यांना तेथील अभ्यासींना संबोधित करावयाचे होते.

दि. ३० रोजी सकाळी गुरुदेव लवकर उठले. त्यांनी संचालित केलेला सत्संग सुमारे १ तास १० मिनिटे चालला. नंतर त्यांनी भाषण केले. तसेच 'व्हिस्पर्स फ्रॉम ब्राइटर वर्ल्ड'च्या चौथ्या खंडासहित, काही लोकांनी त्यांच्या स्वत:च्या आवाजात कथन केलेल्या 'व्हिस्पर्सच्या' एका ध्वनी–फीतीचे गुरुदेवांनी प्रकाशन केले. प्रकाशनानंतर काही ध्वनी–संदेश उदाहरणादाखल ऐकवण्यात आले आणि गुरुदेवांनी 'व्हिस्पर्सच्या वाचनावर भर देण्याची गरज' आपल्या भाषणात अधोरेखित केली.

सकाळी ११ वाजता बंधू बालसुब्रमण्यम यांचे भाषण गुरुदेवांनी त्यांच्या कार्यालयातून उत्कंठतेने ऐकले. ते भाषण अत्यंत प्रभावी असल्याने गुरुदेव तसेच सर्व अभ्यासी ते ऐकून मंत्रमुग्ध झाले. त्यामध्ये गुरुदेवांच्या जीवनातील कित्येक प्रसंगांचे त्यांनी कथन केले आणि उपस्थितांना विनंती केली की,आपण या महान व्यक्तींची फक्त स्तुती आणि खुशामत न करता त्यांच्या जीवनावरुन काहीतरी शिकावे आणि त्यांच्या जीवन–पद्धतिचे अनुकरण करावे.

अतिशय थकव्यामुळे पूज्य गुरुदेवांना युरोपिअन सेमिनारकरिता आयोजित करण्यात आलेला व्हिडीयो कॉल रद्द करावा लागला. दुपारी त्यांनी



रोमानियाहून आलेल्या पाच अभ्यासींची भेट घेतली. रोमानिया तसेच रशियामध्ये साधन-संपन्न अशा पश्चिमी संस्कृतीच्या आक्रमणामुळे स्थानिक संस्कृतीला धोका पोहोचत असल्याबद्दल गुरुदेवांनी चिंता व्यक्त केली.

संध्याकाळचा सत्संग सुरु असतांना गुरुदेवांनी त्यांच्या गोल्फकार्ट मधून आश्रमामध्ये एक फेरफटका मारला. मुलांना भेटण्यासाठी अनेक वेळा ते रस्त्यात थांबत होते. भगिनी सौम्या व तिच्या चमूच्या अतिशय आल्हाददायक अशा नृत्याविष्काराने संध्याकाळच्या सत्राची सांगता झाली।

समारंभांनंतर

दि. ४ मे रोजी संध्याकाळी एका मोठ्या वृक्षाच्या पुर्नरोपणावर देखरेख करण्यासाठी पूज्य गुरुदेव बागेमध्ये गेले होते. या कामासाठी बरीच पूर्वतयारी करण्यात आली होती. अनेक स्वयंसेवकांनी एकत्र येऊन त्या झाडाला उचलून त्याच्या नवीन जागी नेऊन ठेवले. गुरुदेव निरीक्षण करीत असतांना काम करणाऱ्यांना मार्गदर्शनदेखिल करीत होते. त्यानंतर त्यांनी झाडाला पाणी दिले.

पू. गुरुदेवांनी अमेरिकेतील अभ्यासी बंधू ट्रेव्हर वेटमन यांचे 'एकांताचे रुपांतरण' या शीर्षकाचे सादरीकरण बघितले. यावेळी गुरुदेवांनी 'आपले आयुष्य गोंगाटाने कसे भरुन गेले आहे व आपण ध्यानाच्या आचरणाद्वारे आपले अंतर्गत संबंधन कसे पुर्नप्रस्थापित करु शकतो' याविषयी आपले विचार मांडले.

एका संध्याकाळी पू. गुरुदेव जेव्हा आपल्या शयनकक्षातून कार्यालयाकडे जात होते तेव्हा त्यांची एका भगिनीशी भेट झाली. उपजत प्रेरणेने त्यांनी एका थैलीतून एक फळ काढून त्या भगिनीला दिले. फळ स्वीकारल्यावर त्या भगिनीने आपण गर्भवती असल्याचे सांगितले त्यावर पू. गुरुदेव म्हणाले "आशीर्वाद".

एके दिवशी रात्री जेवणाच्या थोडेसे आधी पू. गुरुदेव एका अभ्यासीशी बोलत असताना त्याने एक तामिळ म्हण उद्धृत केली – 'वाघाला कितीही भूक लागली तरी तो गवत खात नाही.' यावेळी पू. गुरुदेवांनी स्पष्ट केले की असे करणे हा वाघाचा अहंकार अथवा गर्व नसतो तर तो त्याचा नैसर्गिक स्वभावधर्म असतो व वाघ केवळ नैसर्गिक नियमांचे पालन करीत असतो. प्राणी तसेच वनस्पती सृष्टीमध्ये ते आपल्या स्वभावाला धरुन असतात व त्यामध्ये ते जराही तडजोड करीत नाहीत वा विचलित होत नाहीत. मानवानेदेखील असे असणे अपेक्षित आहे. त्याने त्याच्या नैसर्गिक स्वभावानुसार मानवी गुणांच्या प्रदर्शनाद्वारे जीवन जगावे व पाशवी प्रवृत्तीचे प्रदर्शन करु नये.

बिदर येथील अभ्यासींसाठीचे चर्चासत्र

दि. ११ मे रोजी पू. गुरुदेव अलाहाबाद बँकेमध्ये गेले व तेथून बिदरहून आलेल्या सुमारे १०० अभ्यासींना भेटण्यासाठी म्हणून निवास-कक्ष 'अ' मध्ये गेले. त्यांनी यावेळी हिंदीमधून संवाद साधला व त्यांनंतर सर्व उपस्थितांना सिटींग दिली. संध्याकाळी त्यांची प्रकृति अस्वस्थ होती व श्वसनाचा त्रास जाणवत होता. नंतर असे लक्षात आले की ते जेव्हा बँकेत गेले होते त्यावेळी तेथे खूप धूळ होती व त्यामुळे त्यांना त्रास झाला.

दि. १३ मे, रविवार रोजी पू. गुरुदेवांनी सत्संगाचे संचालन केले व त्यानंतर बंधू चक्रपाणी यांनी तमिळमधून छोटेसे भाषण केले. ते म्हणाले की गरजेच्या व आपत्तीच्यावेळी इतरांना मदत करण्याची प्रचंड शक्ती व क्षमता मानवामध्ये असून ती यंत्रांच्या शक्ती व क्षमतेपेक्षा कितीतरी जास्त प्रमाणात आहे. गुरुदेव आपले मार्गदर्शक असतांना आपण या सुप्त क्षमतांचा उपयोग करुन सर्व अडथळ्यांवर मात करीत कमीत कमी वेळामध्ये आपले अध्यात्मिक ध्येय गाठले पाहिजे.

पू. गुरुदेव रशियन भाषेविषयी व भाषा शिकण्याविषयी थोडे बोलले. जेव्हा एका अभ्यासीने विचारले, "गुरुदेव, नवीन भाषा शिकण्यासाठी मी स्वत:ला तयार करु शकत नाही कारण मला उद्देश दिसत नाही", पू. गुरुदेव म्हणाले, "त्या भाषेमध्ये पारंगत होणे हाच उद्देश आहे; तुम्हाला अजून दुसरा कुठला उद्देश हवा आहे? पाश्चिमात्य संस्कृतीने आपल्यावरती फार वाईट परिणाम केला आहे. प्रत्येक गोष्ट करत असतांना आपल्याला काय लाभ होईल हे आपल्याला आधी जाणून घ्यायचे असते. एवढेच नाही तर जर मी एखाद्याला ध्यान सुरु करण्यास सांगितले तर तो सुध्दा मला यातून काय मिळेल हे आधी विचारतो. तुम्हाला काहीही मिळणार नाही परंतु तुम्ही काहीतरी बनणार आहात. ही गोष्ट या भाषा शिकण्याच्या बाबतीत सुद्धा तितकीच खरी आहे."

अंदमान व निकोबार द्वीप समूहातील तसेच हुबळी, (उत्तर कर्नाटक)येथील अभ्यासींसाठी परिसंवाद

अंदमान व निकोबार द्वीप समूह येथील अभ्यासींचा एक गट आणि हुबळी येथील अभ्यासींचा एक गट दि. १५ मे पासून जवळजवळ एक आठवडाभर आश्रमात वास्तव्यास होता. आश्रमापर्यंत प्रवास करणे खर्चिक असतानाही अंदमान निकोबार द्वीप समूहातील सुमारे शंभर अभ्यासींनी परिसंवादासाठी येण्याचे परिश्रम घेतले, याचा गुरुदेवांना आनंद झाला.

> " .... तर अवकाश आणि काळ यातील अंतर उपेक्षणीय होते ते प्रेमामुळे. जर तुम्ही कोणावर प्रेम करत असाल तर ती व्यक्ति कोठे आहे याची तुम्ही फिकीर करत नाही. तुम्ही म्हणता, 'ती सतत माझ्या मनात असते.' तर जो पर्यंत एखादी गोष्ट तुमच्या मनात (किंवा सहजमार्गात आपण त्याला 'हृदयात' असे म्हणू) ठसत नाही तोपर्यंत तुम्हाला काळ आणि अवकाश या गोष्टींची आवश्यकता तसेच त्यांच्या मर्यादा ही असतात. म्हणजेच तुम्ही अभ्यासी असाल किंवा नसाल , ऋषि असाल किंवा नसाल, जर तुम्हाला प्रेम करता येत नसेल तर तेथे अंतर हे असतेच"
>
> १८ मे २०१२, चेन्नई

दि. १८ रोजी गुरुदेव त्या अभ्यासींना भेटले. बंधू सोमकुमार यांनी एक भाषण दिले. त्यानंतर गुरुदेवांनी एक व्याख्यान दिले व एक सिटींगसुद्धा दिले. व्याख्यानात ते म्हणाले की, 'अवकाश व काळ यातील अंतर प्रेमामुळे उपेक्षणीय होते'.

दि.१९ मे रोजी गुरुदेव एका अंगावर झोपले होते आणि जागे झाले तेव्हा त्यांच्या पाठीत वेदना होत होत्या. वेदनाशमनासाठी त्यांच्यावर उपचार करावे लागले. ग्रंथदालनामध्ये स्थापित करण्यात आलेल्या नविन छायाचित्र प्रदर्शनास सायंकाळी भेट देण्याचे गुरुदेवांचे नियोजन होते. छायाचित्र प्रदर्शनास भेट देऊन आल्यानंतर ते लेखा विभागातील आपल्या कार्यालयात गेले व कुटीरामध्ये परत येण्यापूर्वी काही वेळ त्यांनी कार्यालयात व्यतीत केला.

रात्रीच्या भोजनानंतर दहा वर्षांचा एक छोटा मुलगा गुरुदेवांना भेटून एक पत्र देण्यासाठी हट्ट बसला. सरते शेवटी गुरुदेवांना भेटण्यात त्याला यश मिळाले आणि गुरुदेवांनीही त्याला खूप वेळ दिला. त्या मुलाने गुरुदेवांपुढे आपली समस्या मांडली व गुरुदेवांनी तिचे निराकरण सुद्धा केले. गुरुदेवांनी त्या मुलाच्या समस्येकडे कसे संपूर्णपणे लक्ष दिले हे पाहणे मनोरंजक होते.

आश्रमातील बांधकाम

ध्यान–कक्षावरील छतामधील पाणी गळती थांबविण्यासाठी छतावरील फरशा काढून तेथे काँक्रीटचा नवीन थर देण्यात आला. ह्या कामात सहाय्य करण्यासाठी अनेक केन्द्रांमधून अभ्यासी आठवडा अखेरच्या सुट्ट्यांच्या दिवसांमध्ये स्वयंसेवक म्हणून येत असत.दरम्यान नियमित सत्संग हे ग्रंथालयाखालील तळघरात घेतले जात होते तर रविवारचा सत्संग मात्र ध्यान–कक्षात घेण्यात येत होता.

दि.२० मे रोजी गुरुदेवांनी पूर्ण एक तासाच्या सत्संगाचे संचालन केले. दुपारी लंडन आश्रमाचे उद्घाटन होणार होते म्हणून गुरुदेवांनी लंडन आश्रमात जमलेल्या अभ्यासींबरोबर व्हिडीयो कॉलद्वारे संपर्क साधला. हे सत्र लहानसे होते पण गुरुदेवांना पाहून लंडन स्थित अभ्यासी रोमहर्षित झाले.

सायंकाळी गुरुदेवांचे अंदमान निकोबार द्वीप समूहातून आलेल्या अभ्यासींसोबत एक समूह–छायाचित्र घेण्यात आले. या नंतर वैद्यकीय केन्द्रात जाण्याचा त्यांचा मनोदय होता. पण अचानक त्यांनी आपला बेत बदलला व ते कुटीराकडे परतले. अर्थात दिवाणखान्यात बसून त्यांनी सर्वांना सिटींग दिले. सर्व अभ्यासींना त्यामुळे सुखद आश्चर्य वाटले.

दि. २१ मे ते २६ मे दरम्यान गुरुदेव 'गायत्री' येथे होते. अभ्यासींना तेथे जाण्यापासून परावृत्त करण्यात येत होते. गुरुदेव दि. २६ रोजी दुपारी आश्रमात परतले. संध्याकाळी ते मुंबईतील काही अभ्यासींबरोबर तेथील आश्रम प्रकल्पाबाबत चर्चा करण्यात व्यस्त होते.

कर्नाटक व कोईंबतूर केन्द्रांतील अभ्यासींसाठी परिसंवाद

कर्नाटक व कोईंबतूर येथून आलेल्या सुमारे सहाशे अभ्यासींकरिता तसेच चेन्नई व आसपासच्या केंद्रांतून मोठ्या संख्येने आलेल्या अभ्यासींसाठी दि. २७ मे रोजी गुरुदेवांनी सत्संग संचालित केला. त्यानंतर गुरुदेव निवास–कक्ष 'अ' येथे गेले व तेथे जमलेल्या अभ्यासींसमोर दिलेल्या भाषणात त्यांनी 'प्रेम' या विषयावर अधिक भर दिला. ते म्हणाले, "जो सर्वांवर प्रेम करतो त्याच्यावर आपण प्रेम करू शकलो नाही तर तो ज्यांच्यावर प्रेम करतो त्यांच्यावर आपण प्रेम कसे करू शकणार?" अभ्यासींच्या बिंदू व क्षेत्र अनुलक्षून होणाऱ्या प्रगती विषयी बोलताना उर्ध्व दिशेकडे निर्देश करत ते म्हणाले की, "जर आपण तेथे नसू, तर आपण कोठेही नसू." ते पुढे म्हणाले की म्हणूनच बिंदू व क्षेत्र यावर भर न देता, अधल्या मधल्या कुठल्याही पायऱ्यांकडे ध्यान न देता आपण अंतिम ध्येयाकडे लक्ष केन्द्रित केले पाहिजे.

गोवा येथील अभ्यासी

दि. २७ ते ३१ मे दरम्यान पू. गुरुदेवांचा मुक्काम पून्हा 'गायत्री' येथे होता. दि. ३१ रोजी ते गोव्याहून आलेल्या अभ्यासींना भेटण्यासाठी म्हणून आश्रमात आले. सकाळी सुमारे ११ वाजता त्यांनी निवासकक्ष 'अ'ला भेट दिली. तेथे केवळ २५ अभ्यासी उपस्थित होते. त्यावेळी सुमारे १५० ते २०० अभ्यासींच्या उपस्थितीची गुरुदेवांची अपेक्षा होती. गुरुदेवांनी उपस्थितांना संबोधित केले व त्यानंतर सत्संगाचे संचालन केले. 'सहजमार्ग साधना ही अतिशय सरळ व प्रभावशाली पद्धति असून ही पद्धति इतरांना समजावून सांगताना कुठलीही समस्या जाणवता कामा नये' यावर गुरुदेवांनी आपल्या भाषणादरम्यान भर दिला. सत्संगानंतर गुरुदेव अतिशय थकलेले दिसत होते व ते

हळूहळू आपल्या कुटीरामध्ये गेले.

रात्रीच्या जेवणानंतर गुरुदेव 'ओमेगा शाळा–माजी विद्यार्थी संस्थेच्या' सभासदांना भेटले. जरी ही संस्था अतिशय लहान रकमेचा व्यवहार करीत असली तरी गुरुदेव ते नोंदी कशाप्रकारे ठेवणार आहेत, खर्च, पावत्या इ. विषयी अतिशय दक्ष होते. हा आपल्या सगळ्यांसाठी एक धडा होता की काम कितीही लहान किंवा मोठे असो, आपले प्रयत्न सारखेच असले पाहिजेत.

ओमेगाच्या माजी विद्यार्थ्यांचे चर्चासत्र

दि. १ जून रोजी पू. गुरुदेवांनी ग्रंथालयाच्या वर असलेल्या सभागृहाचे उद्घाटन केले व त्याचबरोबर ओमेगामधून उत्तीर्ण झालेल्या दोन इयत्तांमधील विद्यार्थ्यांच्या आठवडाभर चालणाऱ्या चर्चासत्राचे उद्घाटन केले. यावेळी गुरुदेवांनी त्यांच्याबरोबर बातचित केली व नंतर सगळ्यांना सिटींग दिली. यानंतर दुपारी गुरुदेव 'गायत्री' या त्यांच्या निवासस्थानी रवाना झाले. 'कान्हा प्रकल्प' अतिशय उत्तम प्रगती करीत असल्याने त्याची नोंदणी स्वत: करावी म्हणून त्यांनी हैद्राबादला जाण्याचा बेत आखला होता. परंतु प्रकृतीच्या कारणास्तव त्यांना त्यांचा प्रवास रद्द करावा लागला. हैद्राबादला जाऊ न शकल्याने त्यांनी कान्हा प्रकल्पावर काम करणाऱ्या स्वयंसेवकांना दि. ६ जून रोजी 'गायत्री' येथे बोलावले व त्यांच्याशी प्रदीर्घ चर्चा केली, त्यांना भेटवस्तू दिल्या व हा प्रकल्प यशस्वी केल्याबद्दल त्यांचे अभिनंदन केले.

शुक्रवार दि. ८ रोजी, एका आठवड्याकरीता गुरुदेव बंधू एम. डी. संथानागोपालन यांच्या निवासस्थानी त्यांच्यासमवेत वास्तव्यासाठी गेले.

गुरुवार दि. १४ रोजी गुरुदेव आश्रमात परत आले. दुसऱ्या दिवशी त्यांना दातावर काही उपचार करुन घ्यावे लागले आणि त्यांना होणाऱ्या वेदना व चेहऱ्यावरील सूज कुणाच्याही सहज लक्षात येण्यासारखी होती.

लखनौच्या अभ्यासींसाठी चर्चासत्र

लखनौ येथील सुमारे ६५० अभ्यासी चर्चासत्रासाठी एकत्र जमले होते. बंधू चक्रपाणी यांनी हिंदीमध्ये अभ्यासींना संबोधित केले. प्रेमाचा अर्थ व तळमळ प्रकट करणाऱ्या काही गाण्यांच्या ओळी त्यांनी आपल्या भाषणात गुंफल्या होत्या. अतिशय सरलपणे याबद्दलचा संदेश त्यांनी अभ्यासींपर्यंत पोचविला.

शनिवारी गुरुदेवांनी सर्व प्रशिक्षकांना सिटींग दिली व त्यानंतर त्यांची प्रकृति बिघडल्यामुळे व विश्रांती घ्यावी लागल्यामुळे ते लखनौच्या अभ्यासींना भेटू शकले नाहीत. बंधू विनोद मिश्रा यांनी 'गुरुदेवांना कुठच्याही परिस्थितीत आनंदी कसे ठेवावे' यावर भाषण दिले. गुरुदेव नंतर या विषयावर बोलत होते व यावेळी त्यांनी 'देण्याच्या प्रवृत्ती'वर भर दिला. ते पुढे म्हणाले की देतांना आपली आंतरिक प्रवृत्ती 'भक्ती'ची असावी.

संध्याकाळी पू. गुरुदेवांनी दोन बैठका घेतल्या. एक लखनौ व इतर केंद्रांमधून आलेल्या अभ्यासींच्या मुलांबरोबर व दुसरी या केंद्रांमधील प्रशिक्षकांबरोबर. सुमारे ८० मुले व युवक गुरुदेवांना भेटले. त्यांनी या मुलांना चॉकलेट्स देऊन त्यांच्याशी संवाद साधला. त्यानंतर गुरुदेवांनी लखनौ केंद्राच्या सुमारे १७ प्रशिक्षकांना सिटींग दिली.

दि. १७ रोजी गुरुदेवांनी सकाळच्या सत्संगाचे संचालन केले. चेन्नई व आसपासच्या केंद्रातील अभ्यासी मोठ्या संख्येने उपस्थित असल्याने व

लखनौच्या अभ्यासींच्या समूहामुळे ध्यान–कक्ष संपूर्ण भरला होता. आदल्या दिवशी गुरुदेव लखनौच्या अभ्यासींना भेटू शकले नसल्याने सकाळी ११ वा त्यांनी त्यांना निवास–कक्ष 'अ' मध्ये भेटावयाचे ठरविले. यावेळी हिंदीमध्ये दिलेल्या भाषणात गुरुदेवांनी योग्य गोष्ट ही वेळेवर व वर्तमानकाळामध्येच केली पाहिजे व तिला 'पुन्हा कधीतरी करू' म्हणून पुढे ढकलू नये याची गरज व महत्त्व अधोरेखित केले. आध्यात्मिकता ही वृद्धापकाळामध्ये करण्याची क्रिया आहे या भ्रामक कल्पनेबद्दल व अटळ अशा वृद्ध होण्याच्या प्रक्रियेबद्दल ते बोलले. 'विवेक' या बद्दलच्या बाबूजींच्या विधानाचा पुन: संदर्भ देऊन गुरुदेव म्हणाले की 'असे जगावे की जसे काही पुढच्याच क्षणी आपण मरणार आहोत'. असे जगण्यातच खरा शहाणपणा आहे. सकाळी सर्वांनी सत्संग केला असल्याने पुन्हा सिटींग हवे आहे का असे या भाषणानंतर त्यांनी विचारले. अभ्यासींनी 'सिटींग हवे' अशी विनंती केली. संपूर्ण सत्रादरम्यान जमलेले सर्व अभ्यासी शिस्तबद्ध होते व शांत बसले होते. त्यामुळे गुरुदेवांना गर्दी–गोंधळ न होता चालण्यास मोकळीक मिळाली.

गुरुदेव व त्यांचे कार्य

गुरुदेवांनी TED मधील ह्वान एन्रिकेझ यांचे "आपली मुले वैशिष्ट्यपूर्ण/वेगळ्या प्रजातीची होतील का?" या विषयावरील भाषण ऐकले जे कोड्यात पाडणारे व विचारास चालना देणारे असे होते. त्यांनी ते लक्षपूर्वक ऐकले व मानवाच्या उत्क्रांतीविषयक काही निरीक्षणे नोंदविली.

गुरुदेवांना उजव्या खांद्यामध्ये काही आठवड्यांपासून वेदना होत होत्या व ते नियमितपणे, एका भौतिकोपचार तज्ज्ञाच्या देखरेखीखाली सांगितल्याप्रमाणे दररोज व्यायाम करीत होते. कोणत्याही परिस्थितीत, त्यांचे दैनंदिन काम नेहमीप्रमाणे सुरळीत चालू असते. जेव्हा त्यांना सांगितले गेले की, त्यांच्या प्रकृति–अस्वास्थ्यामुळे बऱ्याच अभ्यासींना प्रशिक्षक बनविण्याचे प्रस्ताव प्रलंबित आहेत, तेव्हा त्यांनी तात्काळ त्यापैकी ४ जणांना प्रशिक्षक बनविण्यासाठी बोलविण्याचा आदेश दिला.

गुरुदेव मुलांसमवेत वेळ व्यतीत करतात आणि त्यांच्यापैकीच एक असल्याप्रमाणे त्यांच्याशी हितगुज करतात. एका तान्ह्या बाळासमवेत एक जोडपे गुरुदेवांना भेटावयास आले आणि त्यांनी त्याला नाव देण्याची विनंती केली. गुरुदेवांनी काही क्षण विचार करुन त्या तान्ह्या बाळाला 'सरस्वती' असे नाव दिले. ते त्या बाळाशी हितगुज करु लागताच ते बाळ देखील त्यांच्याकडे पाहून हसू खिदळू लागले. एका अभ्यासीने तेव्हा विचारले, "गुरुदेव, बाळे तुमच्याशी हितगुज करु शकतात काय?" ते उत्तरले, "नाही, ती वार्तालाप करीत नाहीत. परंतु जेव्हा ती मला ओळखतात, तेव्हा ती हसतात." आपल्यापैकी कितीजणांनी गुरुदेवांच्या पहिल्याच भेटीत त्यांच्यामधील 'गुरु'ला ओळखले आहे?

युवा कार्यक्रम

पनवेल

पनवेल आश्रमाने दि. २० एप्रिल ते २२ एप्रिल दरम्यान १३ ते १७ वयोगटातील ४५ मुलांसाठी एका शिबीराचे आयोजन केले होते. या वयोगटासंदर्भात असणाऱ्या अडचणींच्या अनुशंगाने विषय निवडले गेले होते. कार्यक्रमाची सुरुवात प्रार्थनेने झाली. यावेळी मुलांना एक एक मेणबत्ती पेटवून देवासंबंधीच्या त्यांच्या कल्पना मांडण्यास सांगितले गेले. विख्यात व्यक्ती व त्यांच्या गुणांवरून गटांची नावे देण्यात आली. उदाहरणार्थ, 'मदर तेरेसा–करूणेची ज्योती'; 'चारीजी, गुरुदेव–प्रेमाचे दिवे'; 'अब्राहम लिंकन– सत्याची मशाल' इ. प्रत्येक गटाला एक अर्धवट गोष्ट देण्यात आली होती, जी त्यांना मुखवटे, कळसूत्री बाहुल्या व नाटिकेच्या स्वरूपात प्रस्तुत करावयाची होती.

विविध क्षेत्रांमधील व्यावसायिक अभ्यासींनी सुसंवाद, व्यवस्थापन, आरोग्य व आहार, उर्जा व उत्साह अशा विषयांवर परस्परसंवादात्मक चर्चासत्रे घेतली. छायाचित्रणाच्या सत्रामध्ये मुलांनी आश्रमाच्या हरितक्षेत्रामध्ये उत्कृष्ट छायाचित्रे घेतली. 'खजिन्याचा शोध' मध्येही मुलांना खूप मजा आली. सामूहिक छायाचित्राची एकेक प्रत स्मृतिचिन्ह म्हणून सहभागींना देण्यात आली.

मणपाक्कम, चेन्नई

'साधे राहा व निसर्गाशी सुसंवाद साधा' या विषयावर मणपाक्कम येथे दि. २७ मे रोजी १७ ते ३० वयोगटातील युवकांसाठी एका कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. वृक्ष–संवर्धनात सक्रिय असणाऱ्या एका स्थानिक NGO ने आश्रमाच्या परिसरात आयोजिलेल्या 'निसर्ग वाटचाल' या कार्यक्रमात सुमारे ५० युवकांनी भाग घेतला. आश्रमातील विविध वृक्षांची ओळख व त्यांच्या महत्वाची माहिती सहभागींना झाली. साध्या राहणीच्या महतीवर आधारित एक व्याख्यान देण्यात आले व या संबंधीचे गुरुदेवांचे विचारदेखील या वेळी सांगितले गेले. सहजमार्गाच्या चौथ्या नियमावर चर्चा झाली. हा कार्यक्रम परस्परसंवादात्मक, व्यावहारिक व उपयोगी होता.

बनशंकरी आश्रम, बेंगलोर

बेंगलोरच्या युवकांना एकत्र आणण्यासाठी चालू असलेल्या प्रयत्नांतर्गत जानेवारी २०१२ मध्ये अनौपचारिक सत्रांची सुरुवात केली गेली. प्रत्येकी दोन तासांची अशी सत्रे महिन्यातील एका रविवारी घेण्यात येत आहेत व सावकाश परंतु निश्चितपणे यामधील सहभागींची संख्या वाढत आहे. या युवक-समूहाला संस्थेच्या उपक्रमांमध्ये भाग घेण्यासाठी उद्युक्त करणे व ध्येयाप्रत वाटचालीमध्ये एकमेकांकडून काही शिकणे हा या सत्रांमागील उद्देश आहे.

या सत्रांसाठी निवडलेले विषय केवळ साधनेपुरते मर्यादित नसून 'मी सहजमार्गामध्ये का आहे?', 'मी कोण आहे?' व 'असण्याकडून बनण्याकडे' यासारखे विविध प्रकारचे विषय होते. प्रत्येक वेळी कला, संगीत, कविता किंवा नाटिका यासारख्या काही नवीन शिकण्यासारख्या गोष्टी सामील करण्याचा प्रयत्न केला गेला. मौज व एकत्रीकरणाची भावना निर्माण व्हावी यासाठी आत्मनिरिक्षण व विषयांवरील चर्चा याव्यतिरिक्त खेळ व विविध उपक्रम यांचा समावेश या सत्रांमध्ये केला गेला. विचारांना बळकटी येण्यासाठी व त्या-त्या विषयांची संकल्पना स्पष्ट व्हावी यासाठी प्रत्येक सत्राच्या शेवटी गुरुदेवांचे ध्वनीमुद्रण वा ध्वनिचित्रमुद्रण दाखविले गेले. येत्या महिन्यांसाठी निवासी शिबीरे, जवळपासाच्या केंद्रांना भेटी, नाटिका तयार करणे, छायाचित्र स्पर्धा अशा कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. गुरुदेवांच्या मार्गदर्शनाखाली हा समूह मोठा होईल व त्यांच्या बंधु-भगिनींच्या सहाय्याने महाविद्यालय व व्यावसायिक आयुष्यातील ताण-तणावाशी सामना करण्यास समर्थ होईल अशी आशा आहे.

महाराष्ट्र

मुंबई येथील पनवेल आश्रमामध्ये दि. १४ व १५ एप्रिल रोजी युवकांचे लक्ष पुन्हा एकदा अध्यात्मिक साधनेच्या महतीकडे वेधले जावे यासाठी दोन दिवसाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यामध्ये मुंबई, पूणे व नासिक मधील सुमारे ७८ अभ्यासींनी भाग घेतला. या कार्यक्रमाचा केंद्रबिन्दू 'गुरुदेवांचे अनुकरण' हा असून, 'मी काय केले पाहिजे?', 'मी कसे वागले पहिजे?' व 'माझे अंतरग कसे असावे?' या तीन प्रश्नांच्या उत्तरांसाठी तीन सत्रांमध्ये हा विभागलेला होता. यामध्ये साधना, चारित्र्य निर्माण, मनोवृत्ती व बदल अशा विषयांवर चर्चा झाली. दहा नियमांची ओळख हा कार्यक्रम त्यानंतर घेतला गेला. समन्वयकाने 'मिशनमधील स्वयंसेवेचे महत्त्व' यावर संक्षिप्त वक्तव्य केले. दुसऱ्या दिवशी प्रश्नोत्तराचा कार्यक्रम झाला ज्यामध्ये साधनेची मूलभूत तत्वे, दररोजच्या साधनेबद्दलचे स्पष्टीकरण, अनुभव इ. विषयावरील प्रश्नांना व्यासंगी अभ्यासी, प्रशिक्षक, कार्यकर्ते व समन्वयक यांनी उत्तरे दिली. यामुळे युवकांच्या बऱ्याच शंकांचे निरसन झाले. मनोवृत्ती व बदल यावरील सादरीकरणानंतर बरेच मजेदार उपक्रम आयोजित करण्यात आले. पुण्याचे बंधु अनमोल यांनी 'ध्यान' यावर एक २ डी ध्वनीचित्रफीत दाखविली. सहजमार्गाच्या साहित्यावरील एका प्रदर्शनानंतर काही भजनांचा कार्यक्रम झाला.

नोईडा

६ ते ११ वयोगटातील मुलांसाठी नोईडा केंद्राच्या युवकांनी मे व जून महिन्यामध्ये बऱ्याच उपक्रमांची योजना आखली होती. या गटाने सुमारे ६० मुलांसाठी दोन आठवड्यांच्या उन्हाळी वर्गांचे आयोजन केले होते. या वर्गांमध्ये 'मैत्री', 'परस्परांमध्ये विभाजन', 'परस्पर सहाय्य', 'ऐकण्याची कला' अशा विषयांचा समावेश होता. हा गट इयत्ता ६ वी ते १० वीच्या मुलांसाठी वर्गांचे आयोजन करण्याबाबत विचार करीत आहे. तसेच शाळांमध्ये जाऊन अध्यात्मिक मूल्याधारित पाठांचा प्रस्तावही विचाराधीन आहे.

मुलांसाठी उन्हाळी शिबिरे

मणपाक्कम– चेन्नई

मणपाक्कम येथे दि.७ ते ९ मेच्या दरम्यान ७ ते १३ वयोगटातील १२० मुले एकत्र आली होती. पहिल्या दिवशी 'प्रेमामध्ये शिस्त' या मध्यवर्ती कल्पनेवर आधारित हस्तकला, मैदानी खेळ असे अनेक उपक्रम आयोजित करण्यात आले होते. या दिवशी मुलांकरिता एक मूल्याधारित चित्रपटही दाखविण्यात आला.

दुसऱ्या दिवशीची मध्यवर्ती कल्पना होती– 'साधेपणा आणि संवेदनशीलता'. हस्तकला सत्र, परस्पर–संवादी व शैक्षणिक असा प्रश्नमंजूषेचा कार्यक्रम आणि कुंभाराच्या चाकावरचा प्रत्यक्ष अनुभव अशा विविध कार्यक्रमांमुळे मुले सक्रिय आणि कामात गुंतून राहिली.

तिसऱ्या दिवशीचा विषय होता– 'आरोग्य आणि निसर्गाशी सुसंवाद'. 'शरीराचा नकाशा' नावाचा एक अनुबोधपट, टीशर्ट रंगविणे, कठपुतळ्यांचा खेळ, खजिन्याचा शोध या आणि इतर अशा अनेक खेळांमुळे मुले दिवसभर कार्यमग्न राहिली. या शिबिरादरम्यान मुलांनी तयार केलेल्या भेटवस्तूंचे यावेळी प्रदर्शनही भरविण्यात आले. या कार्यक्रमाचा विस्तारित भाग म्हणून 'वृक्ष–वाटचाल' असा उपक्रम एका स्थानिक गैरसरकारी संस्थेतर्फे (NGO) आयोजित करण्यात आला होता. यामध्ये अनेक मुलांनी भाग घेतल्यामुळे त्यांना आश्रमातील निरनिराळ्या झाडांची माहिती समजण्यास मदत झाली. मुलांच्या आणि पालकांच्या प्रतिक्रिया प्रोत्साहित करणाऱ्या होत्या.

वडोदरा

वडोदरा केंद्राने दि.२६ मे २०१२ रोजी एका दिवसाच्या उन्हाळी शिबिराचे आयोजन केले होते. यामध्ये ६० मुले सहभागी झाली होती.

या कार्यक्रमात लालाजी महाराज, बाबूजी महाराज, गोष्टी, गाणी व खेळ अशा विविध विषयांवर आधारित स्लाईड शो दाखविण्यात आले. मुलांना यावेळी विविध उपक्रमांमधून मूल्ये शिकता आल्याने त्यांना मूल्याधारित शिक्षणाचा लाभ मिळाला.

पनवेल, मुंबई

दि. २५ ते २७ मे २०१२ दरम्यान झालेल्या शिबिरात ८ ते १२ वयोगटातील २० मुले सहभागी झाली होती. मुलांचे छोट्या गटांमध्ये विभाजन करण्यात आले व त्यांना एक–एक विषय देण्यात आला. त्यावर आधारित एक छोटे नाटक शिबिराच्या तिसऱ्या दिवशी सादर केले गेले. 'निसर्ग' या विषयावर आधारित मुलांनी एक कोलाज बनविले. तसेच त्यांच्यापैकी काही जणांनी लिहिलेली, बसविलेली गाणीही 'संगीत–सत्रादरम्यान' गायिली गेली. संध्याकाळचा आकाशनिरीक्षणाचा उपक्रम सर्वांना अतिशय आवडला. व्यावसायिक प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली दोरीच्या सहाय्याने भिंत कशी उतरायची याचे प्रशिक्षण घेताना मुलांना साहसाची संधी मिळाली. त्यांनी अनेक सामूहिक खेळ, नव–नविन शोध आणि पुष्कळशी मौज–मजा यांचा अंतर्भाव असलेल्या संघ–उपक्रमात भाग घेतला. हस्तकलेच्या सत्रात मुलांनी विविध रंगी फोटोफ्रेम बनविल्या. त्यात सर्वांचा एकत्र फोटो चिकटवून यावेळी त्यांना आठवण म्हणून देण्यात आला. 'ऊर्जा' या विषयावर एका प्रश्नमंजुषेचे आयोजन करण्यात आले होते. मुलांच्या कोवळ्या हृदयांचे लालन–पालन करताना संपूर्ण आश्रम एका विशेष वातावरणाने भरून गेला होता.

पिलिभीट

दि.२५ मे ते ३ जून दरम्यान १० ते १४ वयोगटातील मुलांकरिता पिलिभीट केंद्रामध्ये १० दिवसांचे शिबिर आयोजित करण्यात आले होते. या शिबिरातील वर्गांची वेळ सकाळी ६:३० ते ९:३० अशी होती.

हास्यविनोदाने भरलेल्या व शैक्षणिक अशा अनेक प्रेरणादायी सत्रांचा यात समावेश होता. नैतिक व सामाजिक मूल्यांवर आधारित उपक्रमांनंतर खेळ, चित्रकला तसेच निबंधलेखनही आयोजित केले होते.

शेवटच्या दिवशी पालकांसाठी खुल्या सत्राचे आयोजन करण्यात आले होते. शिबिराच्या शेवटी पालकांनी आपापल्या पाल्यांच्या वर्तणुकीमध्ये झालेल्या सुधारणेविषयी आनंद व्यक्त केला.

घोषणा

पू. गुरुदेवांचा ८६वा जन्मदिवस सोहळा

सर्व अभ्यासी बंधु–भगिनींना डायमंड ज्युबिली पार्क, तिरुपुर, (तामिळनाडू) येथे २३ जुलै ते २५ जुलै २०१२ दरम्यान होणाऱ्या उत्सवासाठी आमंत्रित करण्यात येत आहे.

नवीन झोनल प्रमुखांच्या नेमणूका

झोन २अ – उत्तर तामिळनाडू

बंधू एस. प्रकाश यांच्याकडून बंधू बी.एस. मुरुगन [होसूर] यांच्याकडे हस्तांतरण.

झोन ८ – मध्यप्रदेश

बंधू विकल्प मुंध्रा यांच्याकडून बंधू प्रभाकर दास [भोपाळ] यांच्याकडे हस्तांतरण.

झोन १२ ब उत्तरप्रदेश (मध्य)

बंधू श्यामजी मेहरोत्रा यांच्याकडून बंधू अशोक गर्ग [लखनौ] यांच्याकडे हस्तांतरण.

क्रेस्ट रीट्रीट केंद्र, पानशेत

बंधू के. टी. मंजूनाथ यांच्याकडून बंधू डॉ. राजेंद्र राठोड यांच्याकडे व्यवस्थापकपदाचे दि.१५ जून २०१२ पासून हस्तांतरण.

क्रेस्ट, बेंगलोर

बंधू डॉ. ए. पेरुमेल यांच्याकडून भगिनी सीता कुंचितपादम यांच्याकडे संचालकपदाचे मे २०१२ पासून हस्तांतरण.

पुलगाव आश्रमाचे उद्घाटन

दि.२२ एप्रिल २०१२ रोजी पू. गुरुदेवांनी व्हिडिओ द्वारे पुलगाव, महाराष्ट्र येथील आश्रमाचे उद्घाटन केले व तेथील अभ्यासींसाठी सत्संगाचे संचालन केले. विभाग प्रमुख बंधू वैद्य यांच्यासमवेत काही अभ्यासी यावेळी मणपाक्कम येथे गुरुदेवांच्या सान्निध्यात उपस्थित होते.

१०४९४ चौ.फू. क्षेत्रफळ असणारा पुलगाव आश्रम लहान असूनही छान आहे. ध्यानकक्षाचे क्षेत्रफळ २२९० चौ. फू. इतके असून सुमारे ३०० अभ्यासी बसू शकतील इतका हा कक्ष मोठा आहे. हा आश्रम ग्रंथालय, स्वयंपाकघर, स्नानगृह, स्वच्छतागृह, सेवाकेंद्र इ. सुविधांनी युक्त असा आहे. पुलगाव, अमरावती, यवतमाळ, वर्धा, चंद्रपूर, नागपूर येथील सुमारे २०० अभ्यासी या वेळी येथे उपस्थित होते. आध्यात्मिक उन्नतीकरिता जे काही आवश्यक असते ते देऊन गुरुदेव अभ्यासींची हृदये आपल्या प्रेमाने ओतप्रोत भरून टाकतात.

आठवण प्रेयसीला प्रियकराच्या निकट आणते. या निकटतेला कोणतीच मर्यादा नसते. जितके प्रेम व जिव्हाळा जास्त तितके जास्त आपण "त्याच्या" निकट जातो. हे नाते आम्हाला वारसाहक्काने मिळालेले आहेच. आता ते नाते बळकट करून ते वाढवून त्याच्या जवळ अधिकाधिक जाण्यासाठी प्रयत्न करणे ही जबाबदारी केवळ आपलीच आहे.

कंप्लीट वर्क्स ऑफ राम चंद्र–खंड १
"दहा सूत्रांवरील भाष्यपाठ "सूत्र २" बाबूजी महाराज

प्रशिक्षण कार्यक्रम

जोधपूर, राजस्थान

दि. ३ जून रोजी 'बंधुभाव' या विषयावर एक कार्यशाळा घेण्यात आली. आपण जसे बनावे असे गुरुदेवांना वाटते तसे बनण्याची प्रार्थना करून अभ्यासींनी मोठ्या उत्साहाने या कार्यशाळेत सक्रिय भाग घेतला. दुपारच्या भोजनानंतर 'आपण अजून काय केले पाहिजे?' असे आत्मपरीक्षण करण्यास उद्युक्त करणारे एक सत्र आयोजण्यात आले होते. बदल घडवून आणण्याचे ठरविणे, कशात बदल घडवून आणायचा याचा निर्णय घेणे व त्याप्रमाणे कृती करणे असे विचार अभ्यासींनी व्यक्त केले. सर्व अभ्यासींच्या मते आपण आपली साधना व सेवा नियमितपणे करुन, आज्ञापालन करून व शिस्त अंगी बाणवून गुरुदेवांना सहकार्य केले पाहिजे. आपणा सर्वांमध्ये जे खोलवर रुजलेले प्रेम आहे त्याचा ओघ केवळ गुरुदेवांच्याच दिशेने वाहिला पाहिजे. गुरुदेव स्वत:च्या उदाहरणातून आपल्याला शिकवतात. आपल्याकडून जे काही अपेक्षित आहे त्याचे ते मूर्तिमंत उदाहरण आहेत. सायंकाळच्या सत्संगानंतर नवीन प्रारंभाच्या प्रार्थनेने या सत्राची सांगता झाली.

प्रशिक्षण कार्यक्रम .. ..

शिलाँग, मेघालय

दि. ६ मे रोजी शिलाँग येथे १२ अभ्यासींसाठी प्रथमच एक प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. निरीक्षण व मनन यांच्या सहाय्याने ध्यान करण्याची पद्धत कशी शिकावयाची हे या प्रशिक्षण कार्यक्रमाचे उद्दिष्ट होते. दृक-श्राव्य चित्रफीती, सादरीकरणे व इतर उपक्रम तसेच "मी सांगत आहे" ही बाबूजी महाराजांची दृक-श्राव्य चित्रफीत या सर्वांमुळे अभ्यासींना ते सध्या करत असलेल्या ध्यानाच्या पद्धतीमध्ये परिवर्तन करण्याची आवश्यकता जाणवली.

इंदूर, मध्यप्रदेश

दि. २६ मे रोजी इंदूर आश्रमात रोजनिशी लेखनासाठी 'साधनेतील पक्का पाया'(Grounding in the Practice) या कार्यक्रमात २० अभ्यासींनी सहभाग घेतला. सत्संगाने कार्यक्रमास सुरूवात झाली. त्यानंतर गुरुदेवांचे दृक-श्राव्य सादरीकरण दाखविण्यात आले. अभ्यासींनी त्यांची रोजनिशी लेखनाची सवय व पद्धत या विषयी आत्मपरीक्षण केले आणि काही मुद्दे लिहून घेतले. गुरुदेवांच्या अवतरणांवर आधारित एक सादरीकरण व त्यानंतर गट चर्चा झाली. रोजनिशी लेखनाचे महत्व विषद करणाऱ्या ' 'स्व'चे सत्यस्वरूप' या गुरुदेवांच्या भाषणाने कार्यक्रमाची सांगता झाली.

उत्तर प्रदेश

रोजनिशी लेखन व शुद्धीकरण या साठी 'साधनेतील पक्का पाया' या कार्यक्रमात गोरखपूर केंद्रातील सुमारे तीस अभ्यासी दि. १३ व २० मे रोजी सहभागी झाले होते. मार्गदर्शक सूचनांनुसार सहभागी अभ्यासींना त्यांची मते वाचून दाखविण्यास व त्यानंतर त्यावर चर्चा करण्यास सांगण्यात आले होते. दुसऱ्या सत्रात गुरुदेवांचे एक भाषण ऐकविण्यात आले व अभ्यासींना त्यांच्या रोजनिशीत प्रश्नांची उत्तरे लिहिण्यास सांगण्यात आले. रोजनिशी लेखन व शुद्धीकरण या विषयावरील दोन अभ्यासक्रम या कार्यक्रमात समाविष्ट करण्यात आले होते. अशाच प्रकारचे प्रशिक्षण कार्यक्रम बेहरैच व बलिया केन्द्रांतही सुरू करण्यात आले.

नियोजनावरील कार्यशाळा, म्हैसूर, कर्नाटक

दक्षिण कर्नाटक विभागातील सर्व केन्द्रांतील केन्द्र व जिल्हा समन्वयकांसाठी म्हैसूर आश्रमात दि. १९ व २० मे रोजी 'नियोजन' या विषयावर एक कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. विभागामध्ये १३ समन्वयक आहेत व त्यांना बेंगलोर स्थित मदत केन्द्रातील स्वयंसेवक संघाचे पाठबळ आहे. कुतुहल मिश्रित औत्सुक्याचा भंग करीत कार्यशाळेस सुरूवात झाली. प्रथम सत्रात सहभागींनी आपला परिचय करून दिला. नंतर विभागप्रमुखांनी विभागातील सद्य स्थिति बाबत अहवाल सादर केला. विविध केन्द्रांची सद्य स्थिति, मागील वर्षभरात आयोजित करण्यात आलेले मुख्य उपक्रम आणि ते अमलात आणत असताना त्यांच्या समोर उभी राहिलेली आव्हाने या विषयावर चर्चा करण्यासाठी सहभागींचे गट पाडण्यात आले. दुसरे दिवशी सत्संगानंतर लगेचच गुरुदेवांची 'कर्तव्य व उत्तरदायित्व' या विषयावरील दृक-श्राव्य चित्रफीत दाखविण्यात आली. विविध केन्द्रांतील अभ्यासींची संख्या व गुणवत्ता वाढविण्यासाठी काय करता येईल याच्या नियोजनाबाबत सहभागींच्या गटांनी चर्चा पुढे चालू ठेवली. आश्रम संवर्धन व त्या संबंधित उपक्रमांविषयी सुद्धा मोठ्या केंद्रांतील सहभागींनी चर्चा केली. उद्दिष्टांवर लक्ष केंद्रित करण्यापेक्षा नियोजनाकडे 'हृदया'वर आधारित दृष्टिकोण बाळगला पाहिजे यावर पुनः भर देण्यात आला. सर्व सहभागींनी यामध्ये खुल्या दिलाने सहभाग घेतला तसेच एक नवीनच अंतर्दृष्टि व समान समस्यांवर उपाय सापडल्यामुळे सर्व सहभागी आनंदित झाले.

गोध्रा, गुजराथ

नुकतेच अभ्यासी झालेल्या १३ जणांसाठी गोध्रा आश्रमात दि. १९ मे रोजी अभ्यासी प्रशिक्षण कार्यक्रम (स्तर एक) **CREST** च्या विहित नमुन्याप्रमाणे आयोजित करण्यात आला होता. अभ्यासींचे नातेवाईक व काही पाहुणेसुद्धा या कार्यक्रमास उपस्थित होते. प्रशिक्षणानंतर प्रश्नोत्तरांचे एक सत्र घेण्यात आले. अतिथी व नवीन अभ्यासींना एकेक परिचयात्मक संच भेट देण्यात आला. हा कार्यक्रम अत्यंत उत्साहवर्धक तसेच मिशन मध्ये नुकतेच प्रवेश केलेल्या नूतन अभ्यासींना एक वेगळीच दृष्टि प्रदान करणारा होता.

प्रकाशाचे केंद्र

रतलाम आश्रम– मध्य प्रदेश

पश्चिम मध्यप्रदेशमधील रतलाम हा एक महत्वाचा जिल्हा आहे. या परिसराला माळवा असेही संबोधतात. रतलाम हे प्रशासकीय मुख्यालय असून एक मोठे व्यापारी केंद्र सुद्धा आहे. मुंबई किंवा दिल्ली येथून रेल्वेने रतलामला पोहोचण्यासाठी १२ तासांपेक्षाही कमी अवधी लागतो. जवळचा विमानतळ इंदूर येथे आहे. मध्यप्रदेशातील तसेच गुजरात आणि राजस्थानच्या सीमावर्ती शहरांशी रतलाम रस्त्यांनी चांगल्या पद्धतीने जोडले गेले आहे. इंदूर, उज्जैन आणि बडोदा ही जवळपासची मिशनची केंद्रे आहेत.

मिशनचा आश्रम राज्य महामार्ग क्र. १० वर, ग्राम बर्बाद येथे रतलाम रेल्वे स्टेशन पासून ६ किमी अंतरावर आहे. आश्रमाच्या जमिनीचे क्षेत्रफळ १४५०० चौ. फू. असून ध्यान कक्षाचे बांधकाम १२०० चौ. फू. आहे. साधारणपणे १०० अभ्यासी बसू शकतील एवढी त्याची क्षमता आहे. त्याबरोबरच स्वयंपाकगृह आणि चांगल्या पद्धतीने जोपासलेला सुंदर बगिचा सुद्धा आहे.

आश्रम हा निवासी वसाहतीचाच एक भाग आहे. या वसाहतीतील सर्व भूखंड अभ्यासींचेच आहेत. मिशनच्या वतीने बंधू उमाशंकर वाजपेयी यांनी जमिनीच्या कागदपत्रासंबंधीत व्यवहार पूर्ण केले. दि.२७ जून २०१० पासून पू. गुरुदेवांनी नवीन आश्रमात ध्यान सुरू करण्यास परवानगी दिली. सध्या रतलाम केंद्रामध्ये सुमारे ६५ अभ्यासी आहेत.

रतलाम येथे केवळ दोन–तीन अभ्यासींपासून १९९३ मध्ये मिशनची सुरुवात झाली. एप्रिल २००४ मध्ये स्थानिक प्रशिक्षकांची नियुक्ती होईपर्यंत जवळपासच्या इंदूर आणि उज्जैन केंद्रांच्या प्रशिक्षकांनी या केंद्र उभारणीला मदत केली. २०१० मध्ये रविवारचा सत्संग नवीन आश्रमात सुरू झाला. त्या आधी बुधवार तसेच रविवारचे सत्संग, सिटींग आणि भंडाऱ्याचे कार्यक्रम एका अभ्यासीच्या घरामध्येच होत असत. २००५ मध्ये आश्रमासाठी म्हणून अभ्यासींनी जागा खरेदी केली.

या नव्या आश्रमामध्ये अभ्यासी प्रशिक्षण, खुली सत्रे, नवीन अभ्यासींसाठी कार्यशाळा, शाळांसाठी निबंध स्पर्धा, अशा अनेक कार्यक्रमांबरोबरच 'स्वागत कक्षाची' सुरुवात केल्याने अध्यात्मामध्ये जिज्ञासा असणाऱ्यांसाठी हे एक माहिती केंद्रच झाले आहे. कचरोड, जओरा, मंदसौर, नीमच, खोर(विक्रम सिमेंट) आणि बन्सवारा अशा छोट्या केंद्रांना रविवार सत्संग किंवा पूर्ण दिवसाच्या कार्यक्रमामध्ये सहभागी करून घेतल्यामुळे ह्या केंद्राचा त्यांना आधार वाटू लागला आहे.

पू. गुरुदेवांच्या भेटीचा लाभ मात्र रतलाम केंद्राच्या अभ्यासींना अजून झालेला नाही, त्यासाठी ते आतूर आहेत. राओटी(रतलाम पासून ३३ किमी) या गावी जाताना पू. लालाजी महाराज यांनी रतलाम येथील बाबा मूरखदास यांच्या आश्रमात निवास केला होता, ते स्थान सध्याच्या आश्रमा जवळच आहे. (कंप्लीट वर्क्स ऑफ राम चंद्र–खंड २ पृष्ठ १२२). या गोष्टीचा रतलामच्या अभ्यासींना अभिमान आहे.

To download or subscribe to this newsletter, please visit http://www.sahajmarg.org/newsletter/india For feedback, suggestions and news articles please send email to in.newsletter@srcm.org
© 2011 Shri Ram Chandra Mission ("SRCM"). All rights reserved. "Shri Ram Chandra Mission", "Sahaj Marg", "SRCM", "Constant Remembrance" and the Mission's Emblem are registered Trademarks of Shri Ram Chandra Mission.This Newsletter is intended exclusively for the members of SRCM. The views expressed in the various articles are provided by various volunteers and are not necessarily those of SRCM.